**ठळक बातम्या**

- बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसह तमिळनाडू, पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी मतदान सुरू

- सीबीएसईची इयत्ता दहावीची गुण सुधारण्यासाठीची परीक्षा १५ मे पासून

- मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाच्या तपासावरून मुंबई उच्च न्यायालयाचे NIA आणि विशेष न्यायालयावर कडक ताशेरे

**आणि**

- आयपीएलमध्ये आज मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्स यांच्यात मुंबईत सामना

<><><><><>

तामिळनाडू, पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी आज मतदान सुरू आहे. तमिळनाडूतल्या सर्व २३४ मतदारसंघात आज मतदान होतंय. यासाठी ४ हजार २३ उमेदवार रिंगणात असून ७५ हजारांहून अधिक मतदान केंद्र आहेत. दुपारी १ वाजेपर्यंत तमिळनाडूमध्ये सुमारे ५७ टक्के मतदान झालं होतं.

पश्चिम बंगाल विधानसभेच्या पहिल्या टप्प्यातल्या १५२ जागांवरही आज मतदान सुरू आहे. या टप्प्यात १ हजार ४७८ उमेदवार आहेत. यासाठी निमलष्करी दलांच्या २ हजार ४०० हून अधिक तुकड्या तैनात आहेत. पश्चिम बंगालमध्ये १ वाजेपर्यंत सुमारे ६२ टक्क्यांहून अधिक मतदान झालं होतं. पश्चिम बंगालमध्ये मतदानादरम्यान काही ठिकाणी हिंसाचाराचे प्रकार समोर आले आहे. याप्रकरणी निवडणूक आयोगानं अहवाल मागवला आहे.

बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुसाठीही आज मतदान होतंय. राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार सुप्रिया

सुळे आणि पार्थ पवार, आमदार रोहित पवार यांनी बारामतीत मतदान केलं. राहुरीत उमेदवार अक्षय कर्डिले यांनी मतदानाचा हक्क बजावला. १ वाजेपर्यंत बारामतीमध्ये सुमारे ३२ टक्के आणि राहुरीत २९ टक्क्यांहून अधिक मतदान झालं होतं.

गुजरातमधल्या आणंद जिल्ह्यातल्या उमरेठ विधानसभा पोटनिवडणुकीसाठीही आज मतदान होतंय.

पश्चिम बंगाल मधल्या उर्वरित मतदार संघात येत्या 29 एप्रिल ला मतदान होणार असून पश्चिम बंगाल, आसाम, तमिळनाडू, केरळ आणि पुद्दुचेरी विधानसभा निवडणुकीची मतमोजणी ४ मे रोजी होईल.

<><><><><>

निवडणुकीच्या नंतर पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ होणार असल्याच्या चर्चांचं केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने खंडन केलं आहे. समाज माध्यमांवरच्या या बातम्या खोडसाळ आणि दिशाभूल करणाऱ्या असल्याचं मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

मुंबई मेट्रो मार्गिका ५ अ च्या टप्पा एक आणि टप्पा दोन च्या १८ हजार कोटी रुपयांच्या कामांना राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. त्याचप्रमाणे नागपूर-गोंदिया, भंडारा - गडचिरोली आणि नागपूर- चंद्रपूर या द्रुतगती महामार्गांच्या भूसंपादनासाठी लागणारं कर्ज हुडकोकडून घेण्यास तसंच नाशिक इथल्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी दुसऱ्या टप्प्यातल्या १ हजार कोटी रुपयांच्या कामाच्या प्रस्तावालाही सरकारने मंजुरी दिली आहे. मुंबईत मंत्रालयात मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा विकास समितीची बैठक काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यात हे निर्णय झाले.

<><><><><>

पालघर जिल्ह्यातल्या नागरिकांना सुलभ आणि कार्यक्षम बँकिंग सेवा उपलब्ध करून देण्यासाठी स्वतंत्र जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक स्थापन करण्याच्या प्रक्रियेला गती देण्याचे निर्देश सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिले. या संदर्भात पाटील अध्यक्षतेखाली मंत्रालयात काल झालेल्या बैठकीत ते बोलत होते. ठाणे-पालघर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचं मुख्यालय ठाण्यात असल्याने पालघर जिल्ह्यातल्या नागरिकांना बँकेच्या कामासाठी गैरसोय होते. ही परिस्थिती लक्षात घेऊनच पालघरसाठी स्वतंत्र बँक सुरू करण्याचे निर्देश दिल्याचं पाटील म्हणाले.

<><><><><>

जलसंपदा, जलसंधारण आणि पाणीपुरवठा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांना दिला जाणारा राज्यशासनाचा जलभूषण पुरस्कार २०२२ जाहीर झाला आहे. या पुरस्कारांमध्ये प्रथम क्रमांक यंदा अमरावतीतल्या डॉ. विजय देशमुख यांनी पटकावला आहे. दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार छत्रपती संभाजीनगर इथल्या नरहरी शिवपुरे यांना तर तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार पुण्याच्या भजनदास पवार यांना जाहीर झाला आहे.

<><><><><>

सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावीच्या परीक्षेच्या गुण सुधारणेसाठीच्या परीक्षेला १५ मे पासून सुरूवात होणार आहे. विज्ञान, गणित, सामाजिक विज्ञान आणि भाषा विषयात कामगिरी सुधारायची असेल तर उत्तीर्ण विद्यार्थ्यांना ही परीक्षा देता येणार आहेत. १५ एप्रिलला इयत्ता दहावीच्या नियमित परीक्षेचा निकाल जाहीर  झाला.

<><><><><>

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाच्या तपासावरून मुंबई उच्च न्यायालयानं काल राष्ट्रीय तपास यंत्रणा आणि विशेष न्यायालयावर कडक ताशेरे ओढले. आधीच्या

तपास यंत्रणांनी गोळा केलेल्या पुराव्यांकडे राष्ट्रीय तपास यंत्रणेनं पूर्णपणे दुर्लक्ष केल्याची टीका मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती श्याम चांडक यांनी केली. या प्रकरणातल्या चार आरोपींविरुद्ध पुरेसे पुरावे नसल्याचं सांगत मुंबई उच्च न्यायालयानं काल त्यांना दोषमुक्त केलं. त्यांच्याविरोधातले सर्व पुरावे हे परिस्थितीजन्य असल्याचं निरीक्षण न्यायालयानं नोंदवलं. या चौघांचा बॉम्बस्फोटात सहभाग असल्याचं सांगणारा एकही प्रत्यक्षदर्शी समोर आलेला नाही, यावर न्यायालयानं भर दिला. त्यांच्याविरोधात आरोपपत्र दाखल करायच्या विशेष न्यायालयाच्या निर्णयावरही न्यायालयानं परखड टीका केली. हे प्रकरण कुठल्याही निष्कर्षापर्यंत पोहोचलेलं नाही. राष्ट्रीय तपास यंत्रणा आणि दहशतवादविरोधी पथकानं दाखल केलेली दोषारोपपत्रं परस्परविरोधी असून यामुळे तपासाची दिशा स्पष्ट होणं अशक्य आहे, असं न्यायालयानं आदेशात म्हटलं आहे. ८ सप्टेंबर २००६ रोजी झालेल्या या स्फोटात ३१ जण ठार झाले होते. भाजपाच्या माजी खासदार प्रज्ञा सिंह ठाकुर यांच्यासह ६ इतर आरोपींना गेल्या वर्षी जुलै महिन्यात विशेष न्यायालयानं पुराव्याअभावी सोडून दिलं होतं.

<><><><><>

भोंदूबाबा अशोक खरातला लैंगिक अत्याचार आणि शोषणाच्या पाचव्या प्रकरणात नाशिक न्यायालयाने ६ मे पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. कौटुंबिक समस्यांसाठी मदतीसाठी आलेल्या विवाहित महिलेचे लैंगिक शोषण केल्याप्रकरणी ही तक्रार दाखल झाली होती.

<><><><><>

हिंगोली विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार आणि भाजपचे ज्येष्ठ नेते बळीराम पाटील कोटकर यांचं आज पहाटे ३ वाजता वृद्धापकाळानं निधन झालं. ते ७८ वर्षांचे होते. कोटकर यांनी सुरुवातीला पोलीस पाटील म्हणून आणि नंतर सरपंच

म्हणून काम केलं होतं. कुठलाही राजकीय वारसा नसताना त्यांनी राजकारणात कारकिर्द केली होती.

<><><><><>

नांदेड जिल्ह्यातल्या हदगाव तालुक्यातल्या हडसनीजवळ काल रात्री दुचाकी आणि कारमध्ये झालेल्या धडकेत तीन जण ठार तर दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. या अपघातात दुचाकीवरील तिघेजण दूरवर फेकले गेल्याने जागीच ठार झाले. तर जखमींवर नजीकच्या रूग्णालयात उपचार सुरू आहेत.

<><><><><>

राज्य शासनाच्या राजीव गांधी प्रशासकीय प्रगती अभियान आणि स्पर्धेत सर्वोत्कृष्ट कल्पना उपक्रम प्रकारात नवी मुंबई महानगरपालिकेच्या वस्त्र पुनर्प्रक्रिया सुविधा केंद्राला राज्यस्तरावर दुसरा क्रमांक मिळाला आहे. याअंतर्गत १०० हून अधिक सोसायट्यांमध्ये वापरल्यानंतर टाकून दिलेले सुस्थितीतले कपडे पुनर्प्रक्रियेेसाठी वस्त्र संकलन पेट्यांमध्ये ठेवतात. ऑगस्ट २०२५ पासून आत्तापर्यंत ४१ हजार ५०० किलो कपडे याठिकाणी आणण्यात आले होते. त्यावर पुनर्प्रक्रिया करून त्यापासून ४०० हून अधिक उत्पादने तयार करण्यात आली आहेत.

<><><><><>

घाटकोपर -मानखुर्द लिंक रोडवरच्या बैंगनवाडी सिग्नलजवळ सकाळी पावणे बाराच्या सुमारास लागलेल्या आगीत १० चारचाकी वाहनांचे नुकसान झाले आहे. मुंबई अग्निशमन दलाने ही आग विझवली असून यात एका कारच्या सीएनजी सिलेंडरचा स्फोट झाल्याचे व्हिडिओतून दिसत असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. तसंच या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून तपास सध्या सुरू आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आजचा सामना मुंबई इंडियन्स विरुद्ध चेन्नई सुपर किंग्स यांच्यात होणार आहे. हा सामना मुंबईत वानखेडे स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता सुरू होईल.

काल झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सने लखनौ सुपर जायंट्सवर ४० धावांनी विजय मिळवला. लखनौ संघाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला होता. राजस्थान रॉयल्सने निर्धारित २० षटकांत ६ बाद १५९ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करताना लखनौचा संघ अवघ्या १८ षटकांत सर्व गडी गमावून ११९ धावाच करू शकला.

<><><><><>

मुंबई, ठाणे , पालघरसह कोकणात आज उष्ण आणि दमट हवामान राहील असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. तसंच पुणे, नाशिक, नाशिक घाटमाथा, जळगाव, धुळे या ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.

//<><><><><>//